**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उपसंचालक संवर्गातील पदोन्नती रद्द करणेबाबत.. श्री. योगेश महादेव जाधव, सहायक संचालक**

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
03 SEP 2026
प्राप्त झाले सही..........................

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन आदेश क्रमांक:-ई-१७८४४३६/कोषा. प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०३.०९.२०२६.

**संदर्भ:** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दिनांक १२.०९.२०१६.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दिनांक ०१.०८.२०१९.
३. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२५/प्र.क्र.१६६(E-१६४७९८५)/कोषा.प्रशा-२, दि. २९.०५.२०२६.
४. संचालनालयाचे पत्र क्र.संलेको/प्रशा राप/का-४/योमजाधव/०६.२०२६/८३७, दि.२५.०६.२०२६.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक, गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील (एस-२०:५६१००-१७७५००) अधिकाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उपसंचालक (एस-२३: ६७७००-२०८७००) या संवर्गात संदर्भिय दिनांक २९.०५.२०२६ रोजीच्या आदेशान्वये तात्पूरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांपैकी श्री. योगेश महादेव जाधव यांनी पदोन्नती नाकारत असल्याचे दिनांक २२.०६.२०२६ रोजीच्या अर्जान्वये कळविले आहे. त्यानुसार, संदर्भाधिन क्र.४ येथील पत्रान्वये संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी प्रस्तावित केल्यानुसार, श्री. योगेश महादेव जाधव यांची उपसंचालक संवर्गातील तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून याद्वारे रद्द करण्यात येत आहे:-

१) पदोन्नती नाकारलेल्या श्री. योगेश महोदव जाधव यांचे नाव सन २०२५-२६ च्या निवडसूचीतून वगळण्यात यावे.

२) पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूचीमध्ये (२०२६-२७ व २०२७-२८) श्री. जाधव यांच्या नावाचा पदोन्नतीसाठी विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत (२०२८-२९) त्यांची पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येईल.

३) श्री. जाधव यांची उपसंचालक संवर्गातील सेवाज्येष्ठता ही ते ज्यावेळी पुढील निवडसूचीत (२०२८-२९) पदोन्नतीस पात्र ठरेल व प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदावर रुजू होईल त्या दिनांकापासून विचारात घेतली जाईल.

४) श्री. जाधव यांना दिनांक २९.०५.२०२६ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती दिलेल्या निवडसूचीतील अधिकाऱ्यांचा व त्यानंतरच्या दोन निवडसूचीतील अधिकाऱ्यांचा मानीव दिनांक प्राप्त होणार नाही.

3/9/26.

५) श्री. जाधव यांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ प्रदान केले असल्यास त्याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१९ मधील तरतूदीनुसार सदर लाभ काढून घेण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

२. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रुपाली सं. कबरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सह सचिव, मा. मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२. प्रधान सचिव (ले. व को.), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
४. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
५. संबंधित अधिकारी *
६. निवडनस्ती कोषा. प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)